81

सार्वजनिक गृहनिर्माण उच्च घनता गृहनिर्माण आणि विस्थापितांसाठी गृहनिर्माण या आरक्षणाने बाधित अतिरीक्त क्षेत्रावर मंजूर केलेल्या गृहबांधणी योजनांचा विकास करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : नाजक २०१५/ प्र.क्र.२२/ नाजकधा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक: १२फेब्रुवारी २०१६

वाचा:-

१. शासन निर्णय , गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: एसएसएस १०८६/२३४०/का-१३, दि.२२.८.१९८६.
२. शासन परिपत्रक , गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: एसएसएस १०८६/ (२३४०)/ का-१३, दि.१६.३.१९८८.
३. शासन निर्णय , गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: युएलसी १०८८/(२७९८)/ का-१३ दि.१९.८.१९८८.
४. शासन निर्णय , गृहनिर्माण व विशेज सहाय्य विभाग, क्रमांक: युएलसी १०९२/(५३१३)/ नाजकधा-१, दि. २२.१०.१९९२.
५. शासन निर्णय , गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: युएएलसी १०९४/(५९९६)/नाजकधा-१, दि.२.७.१९९४
६. शासन निर्णय , गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: युएलसी १०९५/ (६१८२)/ युएलसी-१, दि.१६.१.१९९६.
७. शासन निर्णय , गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: नाजक १०९७/ (६७४३)/नाजकधा-१, दि.२१.०१.१९९७
८. शासन निर्णय,नगरविकास विभाग,क्रमांक:नाजक १० (२०००) / प्र.क्र.२०/नाजकधा-१, दि.९.४.२००१
९. शासन निर्णय,नगरविकास विभाग,क्रमांक:नाजक १० (२०००)/प्र.क्र.२०/नाजकधा-१, दि.२३.११.२००७

प्रस्तावना:-

नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ अंतर्गत कलम ८ (४) अन्वये अतिरिक्त घोषित रहिवाशी वापराच्या क्षेत्रावर कलम २० खाली दुर्बल घटक गृहबांधणी योजना राबविण्यासाठी सुट दिली जात होती. अशा योजनांची अंमलबजावणी सुकर होणेच्या दृष्टीने शासन निर्णय दि.२२.८.१९८६ अन्वये मार्गदर्शक तत्वे निश्चित केले असून त्यानुसार कलम २० खालील योजनेच्या आदेशात अटी / शर्ती टाकण्यात येतात व त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करणे जमीनधारकास / विकासकास बंधनकारक असते. योजनांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून या मार्गदर्शक तत्वामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या



Scanned with CamScanner

विकास नियंत्रण नियमावलीतही सार्वजनिक गृहनिर्माण / उच्च घनता गृहनिर्माण/ विस्थापितांसाठी गृहनिर्माण (PH /HDH/ HD) या प्रमाणे आरक्षणे ठेवण्यात आलेली आहेत.

उक्त आरक्षणाखालील योजना राबविताना येणाऱ्या अडचणीबाबत विकासक / योजनाधारकांची निवेदने सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समूह यांचेकडे प्राप्त झालेली होती. त्याअनुषंगाने उक्त आरक्षणाखालील योजनांना दि.२२.८.१९८६ ची मार्गदर्शक तत्वे व त्यानंतरच्या शासन निर्णयातील तरतूदी लागू होतील किंवा कसे याबाबत सक्षम प्राधिकारी बृहन्मुंबई नागरी समूह यांनी शासनाकडे विचारणा केली होती. त्यानुसार सार्वजनिक गृहनिर्माण / उच्च घनता गृहनिर्माण/ विस्थापितांसाठी गृहनिर्माण (PH/HDH/HD) या आरक्षणाने बाधित अतिरिक्त घोषित क्षेत्रावरील कलम २० अंतर्गत मंजूर योजनेच्या अमंलबजावणीसाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

सार्वजनिक गृहनिर्माण , उच्च घनता गृहनिर्माण व विस्थापितांसाठी गृहनिर्माण (PH/HDH/HD) या आरक्षणाखालील जमिनींचा विकास करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत तरतूद करण्यात आली आहे. सदर आरक्षणाखालील जमीनींना शासन निर्णय दि.२.७.१९९४ नुसार कलम २० अंतर्गत गृहबांधणीसाठी सूट दिलेल्या अतिरीक्त क्षेत्राचा विकास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार करण्यात यावा.

सदर योजना नाजकधा कायद्याच्या तरतूदीनुसार अतिरिक्त घोषीत क्षेत्रावर मंजूर केलेल्या असल्याने सदर योजनेतून शासन निर्णय दि.२३.११.२००७ नुसार ५ % बांधीव क्षेत्र पूर्वनिर्धारीत दराने शासनास प्रत्यार्पित करणे तसेच प्रचलित शासन निर्णयानुसार लागणारी मुदतवाढीची दंडनिय रक्कम, प्रगती अहवालाची दंडनिय रक्कम व अतिरिक्त जमीनीवर हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) वापरल्यास त्याकरीता शासन निर्णय दि.३०.६.२००७ व दि.१५.१०.२००७ नुसार देय रक्कम शासनास जमा करणे संबंधित जमीनधारक/ विकासकास बंधनकारक राहील. मात्र अशा आरक्षणाखालील योजनांना दि.२२.८.१९८६ ची मार्गदर्शक तत्वे व त्यानंतरच्या शासन निर्णयातील तरतूदी लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(अ.प्र.अहिरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शसन, मंत्रालय, मुंबई.
५. मा.प्रधान सचिव, (नावि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी , मुंबई/पुणे/नागपुर/नाशिक/ठाणे.
७. उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर/ सोलापूर/ कोल्हापूर/ सांगली.
८. उप सचिव ( नाजकधा ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी , (नाजकधा -२ व ३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner